नि.फौ.खटला क्र. ४/२०२६
निशाणी क्र. २१

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१.**
**सरतपास शपथेवर सुरु.**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | शिल्पा रोहित जाधव, |
| | : | वय – ३५ वर्षे, धंदा – नोकरी |
| राहणार | : | बोपोडी, पुणे |

**सरतपासणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. आर. इंगळे यांचेमार्फत**

१. मी बोपोडी येथे माझ्या पतीसोबत राहते. रोहित जाधव हे माझे पती आहेत. प्रकाश जाधव सासरे, आशा जाधव सासु, शुभांगी जाधव ननंद आहे. मी कलेक्टर ऑफिस हवेली पुणे येथे कामास आहे. माझे आरोपी क्र. १ सोबत ११ मे २०१८ रोजी पुणे येथे धर्माप्रमाणे लग्न झाले होते. लग्नानंतर सातारा येथे माझ्या सासरी मी नांदायला गेले. तेथे सासु, सासरे दोन नंदा व पती राहत होते. लग्नाचा खर्च साधारण ५ ते ७ लाख आला व लग्नात माझ्या पतीला दोन तोळे सोने दिले होते व मला देखील सोन्याचे दागिने केले होते. माझे पती विमाननगर येथे सेक्युरीटीचे काम करतात. लग्नानंतर समीक्षा ही मुलगी झाली. सासरी नांदायला गेल्यावर आरोपीसोबत वाद झाले होते म्हणुन खडकी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला होता. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकुराबाबत बरोबर आहे. फिर्यादीला **निशाणी क्र. २२** देण्यात येते. परंतु, आमचे न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे व ते मला येथुन पुढे व्यवस्थीत नांदवतील असे त्यांनी मला सांगितले आहे. आमच्यात किरकोळ वाद होते. मला आरोपींनी शारिरीक व मानसिक त्रास दिला नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षाला मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलट तपासणीची परवानगी मागितली. परवानगी दिली.**
**अभियोग पक्षातर्फे उलट तपास**

२. हे खरे आहे की, लग्नानंतर आम्ही मी सर्व आरोपीसोबत एकत्र राहत होते. हे खरे नाही की आई वडिलांनी दिलेली सोन्याची चैन चोरल्याचा आळ माझ्यावर घेवुन मला आरोपींनी मानसिक व शारिरीक त्रास दिला. हे खरे नाही की, माझ्या दिसण्यावरून तसेच स्वयंपाकावरून मला घालूनपाडून

आरोपी बोलत असे व अशा प्रकारे मला आरोपींनी त्रास दिला. हे खरे नाही की, दुसरी गर्भधारणा झाल्यावर मला पतीने व सासुने जबरदस्तीने गर्भपात करायला लावला. हे खरे नाही की, आरोपींनी माझ्या चारित्र्यावर संशय घेतला. हे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने मला निवस्त्र मारहाण केली. हे खरे नाही की, अडीच लाख माझ्या आई वडिलांकडुन आणण्याची मागणी करून ती पुर्ण न केल्यास आरोपी क्र. १ मला सांभाळणार नाही अशी धमकी द्यायचा. हे खरे नाही की, ननंद शुभांगी ही तुला नांदु देणार नाही अशी धमकी द्यायची. हे खरे नाही की, माझ्या आईने दोन लाख रूपये माझ्या सासरकडच्या लोकांना दिले होते. हे खरे नाही की, आरोपींनी मला त्रास देवुन घरातुन हाकलून दिले. या सर्व मजकुरास अधोरेखांकित भाग अ देण्यात येतो.

३. हे खरे नाही की, सदर मजकुर मी सांगितला व माझ्या जबाबात नमुद आहे. हे खरे आहे की, माझी आरोपींसोबत तडजोड झाली आहे व आजरोजी आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नाही. हे खरे आहे की, त्या तडजोडीमध्ये मी आरोपींकडे नांदायला जाणार आहे असे ठरले आहे. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे श्री. पी. एस. जाधव यांचेमार्फत**

उलटतपास नाकारला.

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

PRAJKTA SHIRISH APTE
Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2026.03.07 17:50:13 +0530

(पी. एस. आपटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र–२) खडकी, पुणे.

दिनांक – ०७/०३/२०२६